RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ६१] गुरुवार, ऑगस्ट २१, २०१४/श्रावण ३०, शके १९३६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट २०१४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५.**

क्रमांक-व्यकर.२०१४/प्र.क्र.३८/कराधान-३.—महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यावरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा.१६), च्या कलम ६ च्या पोट-कलम (३) च्या परंतुका अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, सार्वजनिक हिताकरिता दिनांक २६ जून २०१४ पासून, या ठिकाणी जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालकांच्या वर्गास किंवा वर्गांना स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणांना स्तंभ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधिन राहून स्तंभ (ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विलंब शुल्क माफ करीत आहे.

**अनुसूची**

| अनु. क्र. | मालकाचा वर्ग किंवा मालकांची वर्गवारी | माफी मिळणेसाठी पात्र विवरण | माफीची मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) |
| (१) | नवीन नोंदणी दाखला घेतला आहे असा मालक. | ज्या विवरणांचा विहीत दिनांक मालकास नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या महिन्याच्या अखेरच्या दिनांकापर्यंत किंवा यथास्थिती विक्रिकर विभागाच्या संकेतस्थळावर मालक " ॲक्टीव्ह " म्हणून दर्शविलेल्या महिन्याच्या अखेरपर्यंत येत असेल अशी विवरणे | स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणांवर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | नोंदणी प्रमाणपत्र दिलेला दिनांक किंवा, यथास्थिती, विक्रीकर विभागाच्या संकेतस्थळावर मालकाचा " ॲक्टीव्ह " म्हणून दर्शविलेला दिनांक समाविष्ट असेल, त्या कालावधीच्या विवरणांच्या विहीत दिनांकापर्यंत किंवा त्यापूर्वी स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली विवरणे दाखल करेल. |
| (२) | ज्यांचा नोंदणी दाखला रद्द झाला असेल आणि त्यानंतर अपील प्राधिकारी किंवा कोणत्याही न्यायालयाने सदर नोंदणी दाखला | ज्या विवरणांचा विहीत दिनांक नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशाचा दिनांक व नोंदणी दाखला पुन:स्थापन | स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणांवर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | अपील प्राधिकारी किंवा कोणत्याही न्यायालयाने पुन:स्थापन आदेश पारित केल्याचा दिनांक अंतर्भूत असेल, त्या कालावधीच्या विवरणाच्या |

अनुसूची – समाप्त

| (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) |
|---|---|---|---|---|
| | आदेशाद्वारे पुनःस्थापन केला असेल, असे मालक. | केल्याच्या आदेशाचा दिनांक यामधील कालावधीत येत असेल. | | विहीत दिनांकास किंवा त्यापूर्वी स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली विवरणे दाखल करेल. |
| (३) | महाराष्ट्राच्या विक्रीकर विभागाच्या स्वयंचलित पद्धतीतील तांत्रिक अडचणीमुळे विवरण दाखल करता आले नाहीत, असे मालक. | महाराष्ट्राच्या विक्रीकर विभागाच्या स्वयंचलित पद्धतीत तांत्रिक अडचण असेल अशा कालावधीत ज्या विवरणांचा विहीत कालावधी येतो अशी विवरणे. | स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणांवर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | (अ) महाराष्ट्राच्या विक्रीकर विभागाच्या स्वयंचलित पद्धतीतील तांत्रिक अडचणींमुळे स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली विवरणे, मालकांचा वर्ग अथवा मालकांच्या वर्गवारीस दाखल करता आले नाहीत अशी, व्यवसायकर आयुक्त किंवा त्यांनी पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याची खात्री पटली असेल.<br>(ब) व्यवसायकर आयुक्त विनिर्दिष्ट करतील अशा कालावधीमध्ये विवरणे दाखल केली असली पाहिजेत. |
| (४) | मालक मृत पावला असेल, अशी मालकी संस्था असलेला मालक. | ज्या विवरणाचा विहीत दिनांक मालक मृत पावला असेल तेव्हा किंवा त्यानंतर लगेचच येत असेल. | स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणावर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | (अ) स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विवरण, मालक मृत पावल्याच्या विवरणाच्या कालावधीच्या अखेरपासून एक वर्षाच्या आत दाखल केलेले असावे.<br>(ब) स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेले विवरण दाखल करण्यापूर्वी मृत मालकाच्या कायदेशीर वारसाने नोंदणी दाखला रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला असला पाहिजे. |
| (५) | या अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापर्यंत वरील अनु. क्र. १ ते ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालकाचा वर्ग अथवा मालकांची वर्गवारी यामध्ये समाविष्ट असलेले मालक. | ज्या विवरणांचा विहीत दिनांक २६ जून २०१४ पासून सुरू होणाऱ्या आणि या अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीतील असेल आणि जी विवरणे या अधिसुचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकानंतर दाखल केलेली असतील, अशी विवरणे. | स्तंभ (क) मध्ये नमूद केलेल्या विवरणांवर देय असणारे संपूर्ण विलंब शुल्क. | या अधिसूचनेचा दिनांक समाविष्ट असलेल्या कालावधीच्या विवरणांच्या विहीत दिनांकास किंवा त्यापूर्वी स्तंभ (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली विवरणे दाखल करेल. |

**सूचना :** (१) या अधिसूचनेद्वारे, विलंब शुल्क भरण्यापासून सूट मिळण्यासाठीच्या कार्यपद्धतीबाबत तसेच त्यासंबंधी माहिती पुरविणेबाबत, व्यवसायकर आयुक्त, वेळोवेळी, त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून सूचना निर्गमित करेल.

(२) या अधिसूचनेमध्ये समाविष्ट असलेले मालक, ज्यांनी विलंब शुल्क भरलेले असेल किंवा, यथास्थिती, कोणत्याही विवरणानुसारच्या परताव्यामध्ये विलंब शुल्क समायोजित केलेले असेल, तर अशा रकमेचा परतावा किंवा यथस्थिती, कुठलेही समायोजन अनुज्ञेय असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. चै. भांगडिया,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st August 2014.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

No. PFT-2014/CR-38/Taxation-3.—In exercise of the powers conferred by the proviso to sub-section (*3*) of section 6 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975 (Mah. XVI of 1975), the Government of Maharashtra, hereby exempt in the public interest, with effect from the 26th June 2014 the late fee, to the extent specified in column (*d*), in respect of returns, specified in column (*c*) of the Schedule appended hereto, by the class or classes of employers specified in column (*b*), subject to the conditions mentioned in column (*e*) of the said Schedule.

SCHEDULE

| Sr. No. (*a*) | Class or classes of employers (*b*) | Returns eligible for exemption (*c*) | Extent of exemption (*d*) | Conditions (*e*) |
|---|---|---|---|---|
| (1) | Employers who have obtained new registration. | Returns of which due date fall at any time, upto the end of the month, in which registration is granted to the employer or the status of the employer is shown as, "Active" on the web site of the Department of Sales Tax, as the case may be. | Whole of the late fee payable, in respect of the returns specified in column (*c*). | Returns specified in column (c) shall be filed on or before the due date for the period of return, containing the date of grant of registration or the status of the employer is shown as, "Active" on the web site of the Department of Sales Tax, as the case may be. |
| (2) | Employers whose Registration Certificate has been cancelled and has been restored subsequently by the order of the appellate authority or any court. | Returns whose due date fall between the date of issuing of the registration cancellation order and date of passing the registration restoration order. | Whole of the late fee payable in respect of the returns specified in column (*c*). | Returns specified in column (*c*) shall be filed on or before the due date for the period of return containing the date of restoration order passed by the appellate authority or any court. |
| (3) | Employers who could not upload the returns due to technical difficulties of the automation system of the Sales Tax Department of Maharashtra. | Returns whose due date fall during the period when the technical difficulties of the automation system of the Sales Tax Department of Maharashtra existed. | Whole of the late fee payable in respect of the returns specified in column (*c*). | (a) Commissioner or an officer designated by him should have been satisfied that due to technical difficulties of the automation system of the Sales Tax Department of Maharashtra certain class or classes of employers could not upload returns specified in column (*c*). |

SCHEDULE—Concld.

| (a) | (b) | (c) | (d) | (e) |
|---|---|---|---|---|
| | | | | (b) Returns should have been filed within the period to be specified by the Commissioner of Profession Tax. |
| (4) | Employer of a proprietary concern whose proprietor dies. | Returns of which due date falls on or immediately after date of the death of the proprietor. | Whole of the late fee payable in respect of the return specified in column (c). | (a) Returns specified in column (c) should have been filed within one year from the end of the period of return during which the proprietor dies. (b) The legal heir of the deceased proprietor should have filed an application for cancellation of registration before uploading the return specified in column (c). |
| (5) | Employers who were covered under any of the class or classes specified at Sr. No.(1) to (4) above upto the date of publication of this notification. | Returns which were due during the period starting from 26th June 2014 and ending on the date of publication of this notification and which are filed after the date of publication of this notification. | Whole of the late fee payable in respect of the returns specified in column (c). | Returns specified in column (c) shall be filed on or before the due date for the period of return containing the date of this notification. |

**Note:** (1) The Commissioner of Profession Tax is empowered to issue guidelines, from time to time, providing details and the procedure for granting exemption from payment of late fee, under this notification.

(2) In case of employers, who have either paid the late fee or have adjusted the late fee against the refund for any of the returns, as the case may be, covered by this notification, then refund or adjustment of such amount shall not be permitted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

O. C. BHANGDIYA,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.